## *Appendix XVII (x)*, (Vide Article - 17.08)

**प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय**

**अत्यंत महत्वाचे**

क्र.:कक्ष-१६/विक्री/२०६/०३-०४
नागपूर-४४० ००६ दिनांक : मे २००३

प्रति :

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (सर्व)
वनसंरक्षक (प्रादेशिक) (सर्व)

विषय : विक्री आगारावर विक्री करण्यात येणाऱ्या वनोपजाच्या पध्दतीबाबत

विक्री आगारावरुन विक्री करण्यात येणारे सागवान तथा आडजात इमारती लाकुड, जळाऊ व इतर वनोपजाची विक्री करताना व वनोपजाची निर्धारित किंमत ठरविताना प्रत्येक वनवृत्तात वेगवेगळया पध्दतीचा वापर करुन वनोपजाची विक्री तथा निर्धारित किंमती लावण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे व अशा पध्दतीमुळे काही वनवृत्तात अनियमीतताही आढळून आली आहे. त्यामुळे शासकीय विक्री आगारावरुन विक्री करताना प्रचलित विक्रीचे धोरण व नियम याबाबत सर्व वनवृत्तात सुसूत्रता असणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरुन वन विभागामार्फत विविध विक्री आगारावरुन विक्री करण्यात येणाऱ्या वनोपजाची निर्धारित किंमत लावताना व मालाची प्रतवारी निश्चित करताना त्यात तफावत नसावी, यासाठी खालील सूचना देण्यात येत आहेत.

१. मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांजकडील आदेश क्र.कक्ष-१६/ग्रेडींग रुल्स/२३०, दिनांक २३ सप्टेंबर १९७८ अन्वये विक्री करण्यात येणाऱ्या इमारती लाकडाची एकुण ५ वर्गवारीत म्हणजे प्लाय-I, प्लाय- II, प्लाय- III, ट्रेड- I आणि ट्रेड- II मध्ये करण्याची तरतुद आहे. मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र.एस-१६/आयड्यु/जीआर/४(७७.७८)/२३०-१/७८-७९, दिनांक ६/१०/१९७८ अन्वये ट्रेड- II पेक्षा कमी दर्जाचे इमारती मालाकरिता संबंधीत वनसंरक्षक यांस आवश्यकता भासल्यास ट्रेड- III, ट्रेड- IV, ट्रेड- V ईत्यादि मध्ये वर्गीकरण करण्याबाबतचे नियम ते करु शकतात. अशा स्पष्ट सूचना व कार्यपध्दती प्रचलीत असताना प्रत्यक्षात वनोपजाची आगारावरुन विक्री करताना इमारती मालाचे ट्रेड- I ते ट्रेड- IV मध्ये वर्गीकरण करण्यात येऊन ट्रेड- IV पेक्षा कमी दर्जा असलेल्या इमारती लाकडास, इमारती लाकडाचा दर्जा कमी न करता

ग्रेड- IV पेक्षा खालील प्रतीच्या मालास ग्रेड- IV मध्येच ठेवून त्यास ग्रेड- IV साठी अस्तित्वात असलेल्या अनुसूचित दराच्या १० ते ५० टक्के दर कमी करुन विक्री करण्यात येणाऱ्या गटांची निर्धारित किंमत निश्चित करण्यात येते. परंतु ही न केवळ गंभीर बाब आहे परंतु वनोपजाच्या विक्रीबाबत तसेच त्यास लावण्यात येणाऱ्या निर्धारित किंमतीच्या पध्दतीचे उल्लंघन करणारी आहे. विक्री करण्यात येणाऱ्या इमारती मालाच्या प्रतवारीनुसार ग्रेड- IV पेक्षा कमी प्रतीच्या मालास ग्रेड- V व ग्रेड- VI मध्ये वर्गीकरण करुन त्यास त्या प्रतीच्या मालाची मागील तीन लिलावात प्राप्त सरासरी किंमत लावून निर्धारित किंमत निश्चित करणे आवश्यक आहे.

२. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)/वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व यांना सूचित करण्यात येते की, मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे उपरोक्त संदर्भीत दिनांक ६/१०/१९७८ च्या परिपत्रकात दिलेल्या सुचनेनुसार इमारती लाकडाचे ग्रेड- V व ग्रेड- VI मध्ये वर्गीकरण करण्याबाबत व त्यास त्या प्रतीच्या मालास मागील लिलावात प्राप्त झालेली सरासरी किंमत लावुन निर्धारित किंमत लावण्याबाबतच्या सूचना त्वरित निर्गमीत कराव्यात. या सुचनांचे पालन न केले गेल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल, याबाबतही उपवनसंरक्षकांना आपले स्तरावरुन सूचीत करण्यात यावे.

३. इमारती मालाची विक्री आगारावर विक्री करताना बहुतांशी वनवृत्तात इमारती गटांची अपेक्षीत किंमत ठरविताना अनुसूचित दराप्रमाणे निर्धारित किंमत लावण्याची प्रथा आहे. ही प्रथा त्वरीत बंद करण्यात यावी. यासंदर्भात मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक ३० सप्टेंबर १९७१ चे स्थायी आदेश क्र.४६ चे अवलोकन व्हावे. या स्थायी आदेशानुसार इमारती मालाची अपेक्षीत किंमत, मालाची वर्गवारी, मागील लिलावात त्याच प्रकारचे मालाकरिता प्राप्त सरासरी किंमत व बाजाराचा कल पाहून निर्धारित किंमत लावण्याबाबतचे आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत. असे असताना विक्री करण्यात येणाऱ्या इमारती मालास अनुसूचित दर लावून निर्धारित किंमत निश्चित करणे हे नियमबाह्य ठरते.

४. वनवृत्तातील विविध आगारावरुन विक्री करण्यात येणा-या इमारती, सागधान व इतर किसम लाकडाचे लिलाव करताना मुख्य वनसंरक्षक (उत्पादन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे परिपत्रक क्र.कक्ष-१६/विक्री/ए-२/८८९, दिनांक २९/९/१९९४ अन्वये जे लिलाव उपवनसंरक्षक यांनी वोनवारावर मंजूरीसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.)/वनसंरक्षक (प्रा.) यांजकडे सादर करावयाचे असतील, अशा प्रकरणात लिलावाच्या शेवटच्या दिवसानंतर ५ दिवसांचे आत उपवनसंरक्षक यांनी लिलाव प्रकरणे आवश्यक माहिती व शिफारशींसह संबंधीत मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षकांकडे अंतीम मंजुरीकरिता सादर करावयाचे आहेत. मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक यांनी अशा प्रकारची प्रकरणे त्यांचे कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर ५ दिवसांचे आत वोनवारावर शिफारस केलेल्या प्रकरणात योग्य तो निर्णय घेऊन संबंधीत उपवनसंरक्षक यांस परत करावयाची आहेत. अशा प्रकारची वोनवारावर ठेवण्यात आलेल्या लिलावास अंतीम मंजूरी देताना कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. परंतु याबाबत असे आढळून आले आहे की, मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचेकडून वोनवारावर ठेवण्यात आलेल्या लिलावास मंजूरी देताना १ ते २ महिन्यांचा किंबहुना काही प्रकरणात त्यापेक्षाही अधिक कालावधी लागला आहे तसेच उपवनसंरक्षक यांजकडूनही विहित मुदतीत वोनवाराची प्रकरणे मंजूरीसाठी संबंधीत मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक यांजकडे सादर करताना या मर्यादेचे बंधन ठेवण्यात आले नाही. वोनवारावर विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या इमारती मालावर निर्णय घेण्यास बराच कालावधी लागल्याने काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रसंगी या नियमांचे उल्लंघन केले गेल्यास संबंधीत वन अधिका-यावर नियमानुसार कारवाई करणेही भाग पडते. त्यामुळे वोनवारावर ठेवण्यात आलेल्या वनोपजाचे विक्रीबाबत मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भीत दिनांक २९/९/१९९४ अन्वये निर्गमीत केलेल्या परिपत्रकातील सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे हे बंधनकारक आहे. याबाबतच्या सुचना सर्व संबंधित उपवनसंरक्षकांना आपले स्तरावरुन त्वरित देण्यात याव्यात.

२.० विक्री आगारावरील वनोपजाची विक्री करताना यापुढे वेळोवेळी देण्यात आलेले आदेश/सूचना/नियम यांचे यापुढे उल्लंघन होणार नाही याबाबत मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक)(सर्व) यांनी दक्षता घ्यावी व त्यांचे वनवृत्तात वनोपजाची विक्री करताना नियमांचे काटेकोरपणे पालन होत आहे याबद्दल योग्य ती काळजी घ्यावी. आवश्यकता भासल्यास सर्व संबंधितांना फेर आदेशाव्दारे या प्रकरणात दक्ष राहण्याबाबत कळविण्यात यावे.

३.० मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना दोनधारावर मंजुरीसाठी प्राप्त झालेल्या प्रकरणात नियमानुसार ५ दिवसांचे आत त्यावर निर्णय घेणे त्यांस बंधनकारक आहे. परंतु दोनधारावर वरील प्रकरणे नामंजूर करताना त्याबाबत सबळ कारणे देऊन नामंजूर करण्यात यावी.

४.० या प्रकरणात असेही आढळून आले आहे की, विक्री आगारावर बऱ्याच कालावधीसाठी इमारती तथा जळाऊ माल अविक्रीत राहिला असल्याने त्याची प्रत दिवसेंदिवस खालावत आहे. आदिवासी मालकी प्रकरणातील अविक्रीत राहिलेल्या मालाबाबत तत्परतेने विक्री करणे अत्यंत आवश्यक आहे. विक्री आगारावर बऱ्याच कालावधीसाठी पडून असलेल्या मालाची विक्री करण्याबाबतही मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी संबंधितांना योग्य त्या सूचना देवून जुन्या मालाची विक्री करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

५.० वन विभागातील प्रत्येक विक्री आगारास सक्षम अधिकारी यांची मान्यता घेणे व मान्यताप्राप्त विक्री आगारावरुन वनोपजाच्या मालाची विक्री करण्याचेही बंधन उपवनसंरक्षकांवर आहे. याचीही समज उपवनसंरक्षकांना देण्यात यावी.

६.० केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अवगत करण्यात यावे.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(उत्पादन व व्यवस्थापन)
महाराष्ट्र राज्य, नागपूर